IITL GROUP
**INDUSTRIAL INVESTMENT TRUST LIMITED**

August 29, 2019

The Manager
Corporate Relationship Department
BSE Limited
Dalal Street
Mumbai – 400 001

The Manager
Listing Department
The National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, 5th Floor
Plot No. C/1, G Block
BKC, Bandra (E), Mumbai 400 051

**BSE Code: 501295**

**NSE Scrip Symbol: IITL**

**Sub: Regulation 47(1)(d) of SEBI (Listing Obligations & Disclosures Requirements) Regulations, 2015**

Sir/Madam,

Pursuant to Regulation 47(1)(d) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing herewith a Notice of 86th Annual General Meeting which is scheduled to be held on Saturday, September 21, 2019 published in Free Press Journal (English) and Navshakti (Marathi) Newspaper of August 29, 2019.

Kindly acknowledge the receipt.

Thanking you,

Yours faithfully,
For **Industrial Investment Trust Limited**

**Cumi Banerjee**
**CEO & Company Secretary**

INDUSTRIAL INVESTMENT TRUST LIMITED MUMBAI

Encl: A/a

CIN No. L65990MH1933PLC001998
**Regd. Office :** Rajabahadur Mansion, 2nd Floor, 28, Bombay Samachar Marg, Mumbai - 400 001.
Tel.: (+91) 22-4325 0100 • Fax : (+91) 22-2265 1105
Email : iitl@iitlgroup.com • Website : www.iitlgroup.com

IITL GROUP

# इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लिमिटेड

सीआयएन क्र. एल६५९९०एमएच१९३३पीएलसी००१९९८
नोंद. कार्यालय : राजाबहादूर मॅन्शन, दुसरा मजला, २८, मुंबई समाचार मार्ग, मुंबई-४०० ००१.
दूर. क्र. : ९१-२२-४३२५०१००, फॅक्स क्र. : ९१-२२-२२६५११०५
ई-मेल : iitl@iitlgroup.com वेबसाईट : http://www.iitlgroup.com

## ८६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई-व्होटिंगची सूचना

सूचना देण्यात येते की, इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लिमिटेड ("कंपनी") ची ८६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शनिवार, २१ सप्टेंबर, २०१९ रोजी दु. २.१५ वा. एम. सी. घिया हॉल, ४ था मजला, भोगिलाल हरगोविंदास बिल्डिंग, १८/२०, के. दुभाष मार्ग, मुंबई-४०० ००१ येथे घेण्यात येणार आहे.

सभेच्या ठिकाणी व्यवहार करण्यात येणारे कामकाज नमूद करण्यात आलेल्या सूचनेसह वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता कंपनीचा ८६ वा वार्षिक अहवाल सर्व सभासदांना टपाल/कुरियरद्वारे त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर आणि डिपॉझिटरीज/कंपनीकडे ज्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केले आहेत त्या सभासदांना इलेक्ट्रॉनिकरित्या पाठविण्यात आला आहे. कंपनीने सर्व ई-मेल आणि पत्र इतर परवानगी असलेल्या पद्धतीने पाठविण्याचे कार्य बुधवार, २८ ऑगस्ट, २०१९ रोजी पूर्ण केले आहे. कोणत्याही सभासदाला वार्षिक अहवाल प्राप्त झालेला नाही किंवा कोणताही गुंतवणूकदार वार्षिक अहवाल पाठविल्यानंतर कंपनीचा सभासद बनला आहे त्यांना वार्षिक अहवालाच्या प्रतीकरिता नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर कंपनी सचिवांकडे विनंती पाठविता येईल आणि त्यांना व्यक्तिशः सुद्धा एजीएमच्या ठिकाणी उपस्थित राहता येईल किंवा प्रतिपत्रीची नियुक्ती करता येईल.

जो सभासद एजीएमच्या ठिकाणी हजर राहण्यास आणि मतदान करण्यास हक्कदार आहे तो सभासदाच्यावतीने हजर राहण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी प्रतिपत्रीची नियुक्ती करण्यासाठी हक्कदार आहे. अशी प्रतिपत्री कंपनीची सभासद असणे गरजेचे नाही. प्रतिपत्री, वैध आणि परिणामकारक ठरण्यासाठी ती रितसर भरलेली, मुद्रांकीत आणि स्वाक्षरीकृत अशी सभा सुरू होण्यापूर्वी ४८ तास अगोदर कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.

**सूचना सुद्धा देण्यात येते की,** कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम ९१, कंपनी (मॅनेजमेंट अँड अॅडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ चा रुल १० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ चा रेग्युलेशन ४२ (एलओडीआर) नुसार कंपनीच्या एजीएमच्या हेतूकरिता कंपनीचे शेअर ट्रान्स्फर बुक आणि सभासदांची नोंदवही शनिवार, १४ सप्टेंबर, २०१९ ते शनिवार, २१ सप्टेंबर, २०१९ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

एलओडीआरच्या रेग्युलेशन ४४ आणि कंपनी अधिनियम, २०१३ (अॅक्ट) चे कलम १०८ सहवाचता सुधारीत केल्याप्रमाणे कंपन्या (मॅनेजमेंट आणि अॅडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ (रुल्स) चा रुल २० नुसार कंपनीने एजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून त्यांचे मतदान करण्यासाठी ई-व्होटिंग सुविधा (रिमोट-ई-व्होटिंग) पुरविण्याकरिता सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) ची सेवा घेतली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे.

I) कंपनीने ई-व्होटिंगकरिता सभासदाची पात्रता निश्चित करण्यासाठी "कट ऑफ" तारीख म्हणून शनिवार, १४ सप्टेंबर, २०१९ निश्चित केली आहे.

II) कोणतीही व्यक्ती, जी एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीची सभासद बनली आहे आणि शेअर्स संपादन केले आहेत आणि कट ऑफ तारखेरोजीस शेअर्स धारण केलेले आहेत, ती रिमोट ई-व्होटिंग सुविधेचा वापर करून तसेच मत पत्रिकेद्वारे सभेच्या ठिकाणी मतदान करून कामकाज बाबींवर मतदान करण्यास सुद्धा पात्र असेल. अशा संभाव्य भागधारकांनी रिमोट ई-व्होटिंग संदर्भातील कार्यपद्धतीच्या तपशिलाकरिता कंपनीची वेबसाईट http://www.iitlgroup.com यावर आणि सीडीएसएलची ई-व्होटिंग वेबसाईट www.evotingindia.com यावर सुद्धा प्रदर्शित केलेल्या ८६ व्या एजीएमच्या सूचनेचा संदर्भ घ्यावा.

III) रिमोट ई-व्होटिंग बुधवार, १८ सप्टेंबर, २०१९ रोजी स. ९.०० वा (भाप्रवे) सुरू होईल आणि शुक्रवार, २० सप्टेंबर, २०१९ रोजी सायं. ५.०० वा (भाप्रवे) संपेल, या कालावधी दरम्यान सभासदांना इलेक्ट्रॉनिकरित्या त्यांचे मतदान करता येईल. त्यानंतर सीडीएसएलद्वारा ई-व्होटिंग मॉड्युल बंद करण्यात येईल.

IV) सभेला हजर असलेले आणि ज्यांनी ई-व्होटिंगद्वारे त्यांचे मतदान अगोदर केलेले नाही, त्या सभासदांना मतपत्रिकेद्वारा त्यांचे मतदान करणे उपलब्ध करून देण्यात येईल.

V) ज्या सभासदांनी इलेक्ट्रॉनिकरित्या त्यांचे मतदान केलेले आहे त्यांना एजीएमच्या ठिकाणी पुन्हा मतदान करता येणार नाही. तथापि, जर सभासदाने इलेक्ट्रॉनिकरित्या तसेच मतपत्रिकेद्वारा त्यांचे मतदान केलेले असल्यास, मतपत्रिकेद्वारा दिलेले मत दुर्लक्षित करण्यात येईल.

VI) कंपनीने ई-व्होटिंग आणि मतदान प्रक्रिया स्वच्छ आणि पारदर्शक पद्धतीने परिनिरिक्षणासाठी परिनिरिक्षक म्हणून मिस्. चंदनबाला ओ. मेहता, कार्यरत कंपनी सचिव यांनी नियुक्ती केली आहे.

VII) रिमोट - ई-व्होटिंगच्या संबंधी कोणतीही चौकशी/तक्रार असल्यास सभासदांनी www.evotingindia.com च्या हेल्प सेक्शन येथे उपलब्ध असलेल्या सभासदांकरिता ई-व्होटिंग युजर मॅन्युअल आणि फ्रिक्वेन्टली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यूज) चा संदर्भ घ्यावा किंवा सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, मॅरॅथॉन फ्युचरेक्स, ए-विंग, २५ वा मजला, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३, ई-मेल आयडी helpdesk.evoting@cdslindia.com /टोल फ्री दूरध्वनी क्रमांक : १८००२२५५३३ येथे संपर्क साधावा.

ठरावांवरील निष्कर्ष कंपनीची एजीएम संपल्यावर दोन दिवसांत घोषित करण्यात येईल. परिनिरिक्षकांच्या अहवालासह घोषित करण्यात आलेला निष्कर्ष सभासदांच्या माहितीकरिता कंपनीची वेबसाईट http://www.iitlgroup.com यावर आणि सीडीएसएलच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात येईल आणि स्टॉक एक्स्चेंजेसकडे सुद्धा पाठविण्यात येईल.

**इंडस्ट्रियल इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लिमिटेड करिता**
सही/-
**कुमी बॅनर्जी**
सीईओ आणि कंपनी सचिव

**ठिकाण : मुंबई**
**तारीख : २८ ऑगस्ट, २०१९**